नियमीत दिवाणी दावा क्र.११/२०२१.
**भागिरथाबाई वि. महाराष्ट्र शासन**
वादीतर्फे सा.क्र.२
**(नि.क्र.६४)**

**<u>शपथेवर सत्य कथन करतो की,</u>**

**माझे नांव:-विवेकानंद चंद्रकांत पाटील,वय:-४३** वर्षे,
**व्यवसाय:-** नोकरी, **रा.लातूर**
**<u>सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.आर.आर.विहीरे यांच्यामार्फत सुरु.</u>**

**१.** लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक शाखा अहमदपूर येथे नामदेव माधवराव आकनगीरे यांचे बचत खाते क्र.१०८५११००२११२७५१ हे आहे. आजरोजी मी या खात्याचे २०२०-२०२१ पासून ते जून-२०२५ पर्यंतचा खाते उतारा आणला आहे. दि.२०/०१/२०२० रोजी या खात्यात रुपये ३,७८,०००/- रक्कम जमा केल्याची नोंद आहे. दि.२५/१०/२०२१ रोजी रुपये २०,००,०००/- अन्य बॅकेच्या खात्यातून या खात्यात वर्ग झाल्याची नोंद आहे. दि.२७/१०/२०२१ व २८/१०/२०२१ रोजी प्रत्येकी रुपये दोन लाख असे एकुण चार लाख काढून घेतल्याच्या नोंदी आहेत. दि.१०/११/२०२१ व १६/११/२०२१ रोजी प्रत्येकी दोन लाख काढून घेतल्याच्या नोंदी आहेत. दि.३०/११/२०२१ रोजी एन.ई.एफ.टी. द्वारे रुपये दोन लाख महाराष्ट्र ग्रामीण बॅक, शाखा शिरुर ताजबंद येथील त्यांच्या स्वत:च्या खाते क्र.५४३३०००३८८८ या खात्यावर वर्ग केली. दि.०१/१२/२०२१ रोजी आर.टी.जी.एस.द्वारे नामदेव आकनगीरे यांनी त्यांच्या स्वत:च्या बॅक आफ इंडीया, शाखा अहमदपूर येथील खाते क्र.०७६४१८२१०००४४३१ या खात्यावर वर्ग केली. दि.०३/१२/२०२१ रोजी बॅक आफ इंडीया, शाखा अहमदपूर खाते क्र.०७६४१८२१०००४४३१ या खात्यावर रुपये पाच लाख वर्ग केली. मी आजरोजी आर.टी.जी.एस. व एन.ई.एफ.टी. च्या नोंदी आणलेल्या आहेत. त्या मी दाखल केलेल्या आहेत. त्याच्या मुळ प्रती मी आजरोजी

सोबत आणल्या आहेत. मुळ प्रती न्यायालयात दाखल करु शकत नाही, कारण ते बॅकेचे रेकार्ड आहे. त्याच्या सत्यप्रती न्यायालयीन अधिक्षकाकडून तपासून मी दाखल केलेल्या आहेत. दि.१६/०६/२०२० रोजी आणखी चार लाख रुपय या खात्यावरुन वर्ग झाले. सदरचा खाते उतारा आमच्या बॅकेचा सॉफ्टवेअरप्रमाणे बरोबर आहे. सदरचे सॉफ्टवेअर माझ्या ताब्यात असून ते माझ्या कोडशिवाय कोणीही उघडू शकत नाही. या खाते उता-याचा सत्यतेचा दाखला मी आणलेला नाही. तो मी दाखल करु शकेन.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.उप्पे यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>**

**२.** मी एम.कॉम पर्यंत शिकलो. संगणकाच्या आय.पी. अड्रेसचे वैयक्तीक ज्ञान मला नाही. दि.०६/०६/२०२३ पासून मी अहमदपूर येथे कार्यरत आहे. हे खरे की, मी वर नमूद केलेले व्यवहार हे माझया वैयक्तीक ज्ञानाचा भाग नाही. मी सांगतो की, ते कागदपत्रांवरुन सांगितले आहे. वर नमूद व्यवहारांच्या काळात विप्रो पिनॅकल हे सॉफ्टवेअर होते. आमच्याकडे वादीने दावा प्रलंबित असल्याबाबत अर्ज दिला नाही. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.** **श्रवणोत्तर स्विकृत**

**फेरतपास नाही.**

समक्ष

स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

दिनांक:२५/०६/२०२५.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदपूर.